महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९०० /२०२३ दि. २० /०७/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, भिवंडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २१/०७/२०२३ रोजी **'टोरंट विरोधी समिती तर्फे आंदोलन'** होणार आहे. सदर दिवशी आंदोलक मोठया प्रमाणात जमा होणार असल्याने सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई/ठाणे, मानकोली कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणा–या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना अंजुर फाटा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वसई रोड मार्गे कारीवली जकात नाका व वीट भट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई/ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने अंजुर फाटा मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या टी.एम.टी./एस.टी. तसेच सर्व प्रकारच्या बसेस व हलक्या वाहनांना नारपोली पोलीस स्टेशन येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** टी.एम.टी./एस.टी. बसेसचे प्रवासी सदर ठिकाणी उतरतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील तसेच हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, मध्यम व हलक्या वाहनांना (उदा. कार, रिक्षा, दुचाकी इत्यादी) रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने रांजनोली नाका येथून वळसा घेवून मुंबई–नाशिक हायवे वरील मानकोली नाका मार्गे अंजुर फाटा अथवा वसई रोडने अथवा ओवळा खिंड मार्गे ओवळी गाव, ताडाळी जकात नाका, पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या एस.टी/के.डी.एम.टी. बसेस यांना रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** एस.टी/के.डी.एम.टी. बसेसचे प्रवासी सदर ठिकाणी उतरतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील.

**प्रवेश बंद –** ५) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणा–या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना पारोळ फाटा, नदीनाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने आंबाडी नाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ अथवा बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) वाडा रोडने नदीनाका कडून भिवंडी शहराकडे येणा–या सर्व हलक्या वाहनांना मेट्रो हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मेट्रो हॉटेल येथून उजवे वळण घेवून संगमपाडा रोड–अजयनगर पर्यंत येवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) वडपा चेकपोस्ट कडून भिवंडी शहरात येणाऱ्या एस.टी. बसेससह सर्व प्रकारच्या वाहनांना धामणगाव, जांभोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने धामणगाव पाईपलाईन येथून उजवे वळण घेवून पाईपलाईन मार्गे वाडा कडे व पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ८) छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून वंजारपट्टी नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अजयनगर–संगमपाडा–मेट्रो हॉटेल येथून डावे वळण घेवून वंजारपट्टी ब्रिज वरून इच्छित स्थळी जातील.

CamScanner

सदरची अधिसुचना दि. २१/०७/२०२३ रोजी दुपारी १४:०० ते १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

**सदरची अधिसुचना ही फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.**

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

संबंधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.